# APPENDIX (D)
## List of Subject Experts

| Sr.No. | Name of the experts | Place |
|---|---|---|
| 1. | Shri. Koli P. A. | Shivaji University, Kolhapur |
| 2. | Shri. Bhanumate C. N. | Shivaji University, Kolhapur |
| 3. | Shri. Gavade P. N. | Shivaji University, Kolhapur |

# ECONOMICS CONCEPT CLARITY TEST
# अर्थशास्त्र संकल्पना स्पष्टता चाचणी

## आर्थिक विकासाचे व नियोजनाचे अर्थशास्त्र

**1. आर्थिक प्रश्न कशामुळे निर्माण होतो**
1. अमर्यादित गरजा व मर्यादित साधनांमुळे
2. मर्यादित गरजा व अमर्यादित साधनांमुळे
3. अमर्यादित गरजा व साधने मर्यादित शिवाय साधनांच्या पर्यायी उपयोगांमुळे
4. वरिलपैकी नाही.

**2. भांडवलशाही अर्थव्यवस्थेचे मुलभूत वैशिष्टय कोणते**
1. खाजगी मालमत्तेचा हक्क 2. स्पर्धेचे प्राबल्य
3. नफा मिळविण्याचा हेतू 4. उपभोक्ते ग्राहक सार्वभौम असतात

**3. समाजवादाचा अवलंब केलेल्या राष्ट्रांमध्ये कोणते दोष दिसून आले**
1. व्यक्तीस्वातंत्र्याचा लोप 2. सरकारी नियंत्रणाचा अतिरेक
3. साधनसामग्रीचा अपव्यय 4. वरिल सर्व

**4. मिश्र अर्थव्यवस्थेचे वैशिष्टय म्हणजे**
1. खाजगी मालमत्तेचा मर्यादित हक्क 2. व्यवसाय निवडीबाबत स्वातंत्र्य
3. मागणी पुरवठयातून किंमत यंत्रणा 4. वरिल सर्व

**5. ज्या देशाचे दरडोई वास्तव उत्पन अमेरिका व पश्चिम युरोप मधील दरडोई वार्षिक वास्तव उत्पन्नाच्या तूलनेत कमी आहे अशा देशांना सामान्यपणे देश म्हणतात.**
1. विकसनशील 2. अविकसीत
3. विकसीत 4. यापैकी नाही

**6. खाजगी क्षेत्र म्हणजे असा विभाग की ज्यावर,**
1. व्यक्तीची मालकी असते 2. व्यक्तीसमूहाची मालकी असते
3. सरकारची मालकी असते 4. 1 व 2

**7. भारताच्या खाजगी क्षेत्रातील सर्वात मोठा उपक्रम कोणता आहे**
1. शेती 2. मोठे उदयोग
3. लघु व कुटीर उदयोग 4. वरिल सर्व

**8. एकमेका सहाय करू अवघे धरू सुपंथ हे या चळवळीचे सूत्र आहे.**
1. खाजगी क्षेत्र 2. सहकारी क्षेत्र
3. सार्वजनिक क्षेत्र 4. वरिलपैकी नाही

**9. सहकाराचे वैशिष्टय हे की सभासदाने आणलेले भांडवल कितीही असो,**
1. एक सभासद एक मत 2. लोकशाही तत्व
3. नफा हा हेतू नसतो 4. वरिल सर्व

**10. ज्या क्षेत्रावर सरकारची मालकी, व्यवस्थापन आणि नियंत्रण असते असे क्षेत्र म्हणजे,**
1. सार्वजनिक क्षेत्र 2. सहकारी क्षेत्र
3. खाजगी क्षेत्र 4. वरिल सर्व

**11. व्यवसायाचे सामान्यत: या क्षेत्रामध्ये वर्गीकरण केले जाते.**

1. प्राथमिक, दुय्यम व तृतीयक  2. प्राथमिक, सेवा व तृतीयक
3. शेती, उदयोग व व्यापार  4. 1 व 2

**12. प्राथमिक क्षेत्रातील उदयोगामध्ये,**

1. यांत्रिक शक्तीचा वापर मोठया प्रमाणावर केला जातो
2. विज्ञान व तंत्रज्ञानाचा उपयोग होतो
3. श्रमशक्तीचा मोठया प्रमाणावर उपयोग केला जातो
4. वरिलपैकी नाही

**13. शेती , वनसंवर्धन, मासेमारी या व्यवसायांचा समावेश,**

1. प्राथमिक क्षेत्रात केला जातो  2. दुय्यम क्षेत्रात केला जातो
3. तृतीयक क्षेत्रात केला जातो  4. वरिलपैकी नाही

**14. वाहतुक दळणवळण, बँकिंग , कारखानदारी इ. उदयोग,**

1. प्राथमिक क्षेत्रात समाविष्ट होतात  2. दुय्यम क्षेत्रात समाविष्ट होतात
3. तृतीयक क्षेत्रात समाविष्ट होतात  4. वरिलपैकी नाही

**15. प्राथमिक व दुय्यम क्षेत्राच्या विकासाला सहायभूत ठरणारे,**

1. तृतीयक क्षेत्र होय  2. उदयोग व्यवसाय क्षेत्र
3. उदयोग व तृतीयक क्षेत्र  4. वरिलपैकी नाही

## गरजांचे अर्थशास्त्र

**16. दारिद्रयाचा विचार कोणत्या दृष्टोकोनातून होतो.**

1. सापेक्ष दारिद्रय  2. निरपेक्ष दारिद्रय
3. सापेक्ष व निरपेक्ष दारिदय  4. दारिद्रय रेषा

**17. दारिद्रय निर्मूलनाबाबत कोणती समस्या आहे.**

1. रोजगार पुरविणे  2. रोजगाराच्या संधीचा विस्तार करणे
3. कनिष्ट पातळीच्या रोजगाराची उत्पादकता वाढविण  4. 1 व 2

**18. दारिद्रयाचे जास्त प्रमाण कोठे आढळते.**

1. ग्रामिण कामगार कुटुंबात  2. शहरी असंघटित श्रमिकांत
3. शहरी सुशिक्षीतांत  4. वरिल सर्व

**19. दारिद्रय म्हणजे अशी अवस्था की,**

1. समाज जीवनाच्या मुलभूत गरजासुध्दा पूर्ण करू शकत नाही
2. समाजात फार मोठा असंतोष असमाधानी निर्माण होतो
3. अशी अवस्था की लोकांना अत्यंत निकृष्ट राहणीमान जगावे लागते
4. वरिल सर्व

**20. डॉ.दांडेकर व रथ यांच्या अभ्यासानुसार प्रत्येक व्यक्तीच्या पोषक आहाराची योग्य किमान पातळी (उष्णांक) म्हणजे,**

1. 2250  2. 2150  3. 2050  4. 2350

**21. मोठया प्रमाणावरच्या दारिद्रयावर यशस्वी चढाई करण्याकरिता आवश्यक आहे.**

1. आर्थिक वृध्दी  2. विषमता कमी करणे
3. आर्थिक वृध्दी व विषमता कमी करणे  4. श्रीमंताची श्रीमंती कमी करणे

## लोकसंख्येचे अर्थशास्त्र

**22. भारतातील लोकसंख्येचा प्रश्न भारतातील लोकांच्या ------ निगडीत आहे.**

1. जीवनाशी  2. आर्थिक कल्याणाशी
3. भावनेशी  4. प्रगतीशी

**23. लोकसंख्येच्या संक्रमण सिध्दांतानुसार अविकसीत देशाचा आर्थिक विकास सुरू होण्यापूर्वी जननदर व मृत्यूदर हा,**

1. कमी असतो  2. मोठा असतो
3. केव्हा मोठा तर  4. केव्हा कमी असतो

**24. लोकसंख्या विस्फोट होण्याचे कारण कोणते ,**

1. जननदर जास्त असणे  2. लोकसंख्येचे प्रमाण मोठे असणे
3. जननदर जास्त व मृत्यूदर कमी असणे  4. जननदर व मृत्यूदर जास्त असणे

**25. लोकसंख्येच्या घनतेमध्ये वाढ होण्याचे कारण म्हणजे,**

1. नैसर्गिक साधनसामुग्रीची विपुलता व आधुनिक तंत्रज्ञान होय
2. लोकसंख्या होय  3. दळणवळण साधनांची उपलब्धता
4. वरिलपैकी नाही

**26. लोकसंख्या धोरणामध्ये लोकसंख्येची अमर्याद वाढ थोपवून धरण्यासाठी कोणते मार्ग सुचविले गेले**

1. वैदयकिय व शैक्षणिक मार्ग  2. कुटुंब नियोजन
3. लोकसंख्या शिक्षण  4. वरिल सर्व

**27. ग्राहक चळवळीची मूळ सुरवात येथे झाली**

1. भारत  2. अमेरिका  3. इंग्लड  4. जर्मनी

**28. ग्राहक संरक्षण कायदयातील तरतुदीनूसार तक्रार कोण नोंदवू शकतो**

1. स्वत: ग्राहक  2. अधिकृत ग्राहक मंच
3. राज्य अथवा केंद्र सरकार  4. वरिल सर्व

**29. ग्राहक तक्रार कोणत्या ठिकाणी नोंदवू शकतो**

1. जिल्हा मंच  2. राज्य आयोग
3. राष्ट्रीय आयोग  4. वरिल सर्व

**30. पूर्ण रोजगार या संकल्पनेचा अर्थ,**

1. जे काम करण्यास समर्थ आहेत आणि ज्यांना काम करण्याची इच्छा आहे त्यांना काम पुरविणे
2. जे काम करण्यास समर्थ आहेत
3. ज्यांची काम करण्याची इच्छा आहे
4. वरिलपैकी नाही

**31. कोणत्याही अर्थव्यवस्थेत रोजगाराची स्थिती केव्हाही आढळत नाही**

1. अपूर्ण  2. पूर्ण  3. हंगामी  4. वरिलपैकी नाही

**32. बेकारी या संकल्पनेचा अर्थ,**

1. अस्तित्वात असलेल्या वेतन दरावर काम करण्याची ज्यांची इच्छा आहे
2. जे शारीरिक व बौध्दिक दृष्टीने समर्थ असतात
3. ज्यांना उत्पन्न मिळविण्याची संधी मिळत नाही  4. वरिल सर्व

33. ग्रामिण भागात ही बेकारी मोठया प्रमाणात दिसून येते,

1. हंगामी 2. पछन्न बेकारी
3. अर्धबेकारी 4. वरिल सर्व

34. भारतीय अर्थव्यवस्थेत शेती असे योगदान करते

1. राष्ट्रीय उत्पन्न व रोजगारात शेतीचा वाटा
2. औदयोगिक आदाने व अन्नपुरवठयातील शेतीचा वाटा
3. शासकिय महसूल व व्यापारातील शेतीचा वाटा
4. वरिल सर्व

35. कृषी आदानांमध्ये कोणत्या घटकांचा समावेश होतो.

1. पाणी, बियाणे 2. सेंद्रिय खते व किटकनाशके
3. वित्तपुरवठा, हत्यारे, तंत्रज्ञान 4. वरिल सर्व

36. हरितक्रांतीने या उत्पादनात प्रचंड वाढ घडवून आणली

1. भात 2. गहू 3. कापूस 4. ज्वारी

37. शेतीत वृध्दीची प्रक्रिया वेगवान करण्यासाठी कशाची आवश्यकता आहे.

1. देशाचे औदयोगिकरण 2. शेती आधारित उदयोगांची वाढ
3. शेती आदाने पुरविणा-या उदयोगांची वाढ 4. 2 व 3

38. भारतीय अन्न समस्या ही पूढील प्रश्नाचे प्रकटीकरण आहे.

1. उत्पादन 2. वितरण
3. उपभोग 4. वरिल सर्व

39. भारतीय अन्नसमस्येचे पूढिल वैशिष्टय सांगता येईल

1. संख्यात्मक बाजू 2. गुणात्मक बाजू
3. अन्नधान्याच्या वाढत्या किंमती 4. वरिल सर्व

## बँकिगचे अर्थशास्त्र

40. रिझर्व्ह बँकेची स्थापना या वर्षामध्ये झाली.

1. 1934 2. 1949 3. 1947 4. 1955

41. बँकाची बँक म्हणून कोणती बँक देशातील कार्य करते.

1. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया 2. स्टेट बँक ऑफ इंडिया
3. बँक ऑफ इंडिया 4. सेंट्रल बँक ऑफ इंडिया

42. भारतातील सर्वात मोठी व्यापारी बँक कोणती.

1. बँक ऑफ महाराष्ट्र 2. स्टेट बँक ऑफ इंडिया
3. बँक ऑफ इंडिया 4. कॅनरा बँक

43. सहकारी बँक व्यवसायाची त्रिस्तरीय रचना अशी असते.

1. प्राथमिक सहकारी संस्था , जिल्हा मध्यवर्ती बँक, शिखर बँक
2. शिखर बँक, जिल्हा मध्यवर्ती बँक, प्राथमिक सहकारी संस्था
3. जिल्हा मध्यवर्ती बँक, शिखर बँक, प्राथमिक सहकारी संस्था
4. वरिलपैकी नाही

## स्थूल अर्थशास्त्र

**44. एकाच देशातील वेगवेगळ्या प्रदेशात होणा-या व्यापाराला ------------ म्हणतात.**

1. विदेशी व्यापार
2. देशांतर्गत व्यापार
3. अंतर्गत व्यापार
4. वरिलपैकी नाही

**45. विदेशी किंवा आंतरराष्ट्रीय व्यापार म्हणजे,**

1. एकाच देशात होणारा व्यापार
2. दोन किंवा अधिक देशातील व्यापार
2. एकाच देशातील वेगवेगळ्या प्रदेशात होणारा व्यापार
3. वरिल सर्व

**46. भारताच्या पारंपारिक वस्तूच्या निर्यातीत कोणत्या वस्तूंचे महत्व वाढत आहे.**

1. चर्म व चर्मोत्पादने
2. ज्यूट
3. सूती कापड
4. वरिल सर्व

**47. भारताच्या आयातीत कोणत्या वस्तू आहेत.**

1. पेट्रोलियम तेल उत्पादने
2. विजेची यंत्रे
3. सूती कापड, तयार कपडे
4. 1 व 2

**48. जर विदेशी देण्यांपेक्षा विदेशी येणी जास्त असतील तर त्यास -------- व्यवहार शेष म्हणतात.**

1. शिलकीचा
2. तूटोचा
3. कधी तूटोचा तर कधी शिलकीचा
4. वरिलपैकी नाही

**49. व्यवहार तोलातील चालू खाते काय दर्शविते.**

1. कोणत्याही दिलेल्या वर्षातील व्यवहारतोल शिलकीचा की तूटोचा हे दर्शविते
2. दिलेल्या वर्षातील व्यापार शिलकीचा की तूटोचा दर्शविते
3. 1 व 2
4. वरिलपैकी नाही

## नियोजनाचे अर्थशास्त्र

**50. सर्व नियोजनात कोणत्या उदिदष्टाला खरे महत्व देण्यात आले.**

1. जलद आर्थिक विकास
2. जलद औदयोगिकरण
3. राष्ट्रीय उत्पन्नाच्या वाढीचा दर उंचावणे
4. दारिद्रय निर्मूलन करणे

**51. अगदी सुरूवातीपासून भारतीय आर्थिक नियोजनाचे कोणते महत्वाचे उदिदष्ट आहे.**

1. बेरोजगार व अर्धबेरोजगार यांचे निर्मूलन करणे
2. आर्थिक विषमता कमी करणे
3. पादेशिक संतुलन साधने
4. औदयोगिकरण करणे

**52. भारताच्या योजना सामान्यपणे,**

1. विकासाभिमुख झाल्या आहेत
2. रोजगाराभिमुख झाल्या आहेत
3. उदयोगविकासाभिमुख झाल्या आहेत
3. 1 व 3

**53. सरकारने नियोजनात सार्वजनिक क्षेत्राच्याव्दारे अर्थव्यवस्था विकसीत करण्याचे उदिदष्ट बाळगते.**

1. समाजवादी समाजरचनेचे
2. लोकशाही
3. भांडवलशाही
4. संमिश्र

## औदयोगिक अर्थशास्त्र

54. भारताच्या आर्थिक व औदयोगिक विकासात ------ उदयोगाचा हिस्सा महत्वाचा आहे.

1. मोठे उदयोग (जड)
2. लघु उदयोग
3. संगणक
4. इलेक्ट्रॉनिक

55. जड उदयोगांमध्ये कोणत्या उदयोगांचा समावेश होतो.

1. लोखंड व पोलाद उदयोग
2. कापड उदयोग
3. साखर उदयोग
4. वरिल सर्व

56. भारतासारख्या वाढत्या लोकसंख्येच्या देशात लघुउदयोग कोणत्या दृष्टोने महत्वाचे आहेत.

1. रोजगार निर्मितीच्या दृष्टोने
2. औदयोगिकीकरणाच्या दृष्टोने
3. आर्थिक वाढ दृष्टोने
4. वरिल सर्व

57. शेती व्यवसायानंतर कोणत्या क्षेत्राचा क्रम लागतो.

1. मोठे उदयोग
2. लघु उदयोग
3. व्यापार
4. वरिलपैकी नाही

## वाहतूकीचे अर्थशास्त्र

58. भारतात आशिया खंडातील सर्वात मोठे वाहतूक व्यवसाय कोणते आहे.

1. रस्ते वाहतूक
2. रेल्वे वाहतूक
3. हवाई वाहतूक
4. जल वाहतूक

59. रस्ते वाहतूकीत रस्त्यांचे वर्गीकरण कशाप्रकारे केले गेले.

1. राष्ट्रीय महामार्ग
2. राज्य महामार्ग
3. जिल्हा मार्ग
4. वरिल सर्व

60. राष्ट्रीय महामार्गाची निर्मिती व देखभाल कोणत्या सरकारकडे असते.

1. केंद्र सरकार
2. राज्य सरकार
3. संलग्न संस्था
4. राष्ट्रीय ग्रामिण रोजगार कार्यक्रम

61. वाहतुकीचा सर्वात कमी खर्चाचा प्रकार म्हणजे,

1. रस्ते वाहतूक
2. रेल्वे वाहतूक
3. जल वाहतूक
4. हवाई वाहतूक

62. भारतात वीज या पध्दतींनी निर्माण केली जाते.

1. जलउर्जा
2. औष्णीक उर्जा
3. अणु उर्जा
4. वरिल सर्व

63. भारताच्या जलसिंचनाच्या प्रमुख पध्दती कोणत्या .

1. विहीरी व कूपनलिका
2. तलाव
3. कालवे
4. वरिल सर्व

## सूक्ष्म अर्थशास्त्र

**64. मूल्य व किंमत या दोन्ही गोष्टी**

1. एकच आहेत
2. वेगवेगळया आहेत
3. समान आहेत
4. वरिलपैकी नाही

**65. जेव्हा एखादया वस्तूचे मूल्य हे पैशात सांगितले जाते तेव्हा त्याला त्या वस्तूची ---------- म्हणतात.**

1. किंमत असे म्हणतात
2. मागणी असे म्हणतात
3. मूल्य असे म्हणतात
4. वरिलपैकी नाही

**66. ज्या वस्तू दूर्मिळ असून ज्याच्या प्राप्तीसाठी काही तरी किंमत दयावी लागते अशा वस्तूंना काय म्हणतात.**

1. मुक्त वस्तू
2. आर्थिक वस्तू
3. अनार्थिक वस्तू
4. वरिलपैकी नाही

**67. हवा, सूर्यप्रकाश, पाणी या वस्तूंना ---------- म्हणतात.**

1. मुक्त वस्तू
2. आर्थिक वस्तू
3. अनार्थिक वस्तू
4. भौतिक वस्तू

**68. उपयोगिता, दुर्मिळता, विनिमेयता व मनुष्यबाहयता हे चार गुणधर्म असलेल्या कोणत्याही भौतिक, अभौतिक वस्तूला म्हणतात.**

1. भांडवल
2. संपत्ती
3. मूल्य
4. वरिलपैकी नाही

**69. सीमांत उपयोगितेचे विश्लेषण असे गृहित धरते की, उपयोगीता**

1. मापनीय आहे
2. मापनीय नाही
3. तूलनायोग्य आहे
4. काही बाबतीत मापनीय नाही.

**70. अतिविपुल आणि मुक्त वस्तूंबाबत सीमांत उपयोगिता**

1. शून्य असते
2. धनात्मक असते
3. ऋणात्मक असते
4. धनात्मक अगर ऋणात्मक

**71. गरजेचे अगर इच्छेचे मागणीत रूपांतर होण्याकरिता वस्तूची इच्छा आणि**

1. वस्तूचे पैसे देण्याची क्षमता हवी
2. वस्तूचे पैसे देण्याची इच्छा हवी
3. बाजारात जाण्याची ग्राहकाची क्षमता हवी
4. वस्तूचे पैसे देण्याची क्षमता व बाजारात जाण्याची इच्छा हवी

**72. उपभोक्ते गरीब असताना ------ वस्तू जास्त नग संख्येने खरेदी करतात.**

1. गिफेन वस्तू
2. अत्यावश्यक वस्तू
3. वरिल दोन्हीही नाही
4. वरिल दोन्हीही

**73. उपयोगिता ही मनाने अनुभवली जाते म्हणून उपयोगिता -------- संकल्पना आहे.**

1. मानसिक
2. भावनिक
3. वैचारिक व मानसिक
4. मानसिक व भावनिक

**74. सीमान्त उपयोगिता म्हणजे,**

1. ज्यादा अगर भर घालणा-या नगाची उपयोगिता
2. ज्यादा नगापासून प्राप्त होणा-या उपयोगितेमुळे मिळणारी एकूण उपयोगिता
3. ज्यादा नगापासून वाढू शकणारी उपयोगिता
4. ज्यादा नगापासून कमी अगर जास्त होणारी उपयोगिता

75. वस्तू अगर सेवेकरिता एकत्रीत अशा सर्व ग्राहकांची समस्त मागणी म्हणजे,

1. उद्योगाची मागणी
2. समस्त मागणी
3. छेदक मागणी
4. पर्यायी वस्तूंची मागणी

76. मागणीची लवचिकता मागणी वक्रावरील वेगवेगळया बिंदूपाशी

1. वेगवेगळी असते
2. समान असते
3. एक असते
4. वरिलपैकी नाही

77. वस्तूचा पुरवठा म्हणजे,

1. एका उत्पादकाकडे असणारा उपलब्ध साठा
2. सर्व उत्पादकांकडे असणारा उपलब्ध साठा
3. उपभोगाकरिता उपलब्ध असणारा साठा
4. वरिलपैकी नाही

78. पुरवठयाची लवचिकता म्हणजे ------ बदलामुळे पुरवठयात होणारा बदल

1. वस्तूच्या किंमतीच्या
2. पुरवठयाच्या परिस्थितीतील
3. ग्राहकाच्या अभिरूचीतील
3. वस्तूच्या खर्चाच्या

79. वस्तूच्या पुरवठयातील बदल ------- अवलंबून असतो.

1. किंमतीतील बदलावर
2. उत्पादन घटकांच्या पुरवठयातील बदलांवर
3. उत्पादन तंत्रावर
4. वरिल सर्व

80. विक्रेता बाजारात वस्तूची जी प्रत्यक्ष परिमाणे आणतो ती त्याच्या ------ किंमतीवर अवलंबून असते.

1. प्रातिनिधीक
2. अपेक्षित
3. राखीव
4. प्रचलित

81. राखीव किंमत म्हणजे,

1. राखीव गटातील लोकांकरिता आकारलेली किंमत
2. सार्वजनिक वितरणाची किंमत
3. सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत विकल्या जाणा या नियंत्रीत वस्तूंच्या किंमती
4. ज्या किंमतीस उत्पादक पुरवठयाचे बाजारात प्रत्यक्ष परिमाणे आणतो

## व्यावहारिक अर्थशास्त्र

82. उत्पादन फलन -------- व्यक्त करते.

1. आदाने व प्रदाने यांच्यातील भौतिक परिमाणाबाबतचा निव्वळ तांत्रिक संबंध
2. आर्थिक संबंध
3. उत्पादन घटकांचे प्रमाण
4. प्रदानाचे प्रमाण

83. उत्पादन हे,

1. नफयाचे फलन आहे
2. घटकांचे फलन आहे
3. किंमतीचे फलन आहे
4. खर्चाचे फलन आहे

84. जेव्हा विशिष्ट प्रमाणात उत्पादन घटक वापरले जातात व उत्पादनदेखील त्याच प्रमाणात बदलते तेव्हा ही बाब,

1. स्थिर फलाची होय  2. घटत्या सीमांत फलाची
3. वाढत्या सीमांत फलाची  4. वरिलपैकी नाही

85. उदयोगसंस्थेला घटते फल येते ते,

1. सर्व आदाने अतिरिक्त वापरणे
2. इतर सर्व आदाने स्थिर ठेवून एक आदान अधिकाधिक वापरणे
3. आदानांचा कार्यक्षमपणे वापर न होणे
4. सर्व आदानांची परिमाणे कमी करणे

## श्रमाचे अर्थशास्त्र

86. पूर्ण स्पर्धेच्या बाजारपेठेतील कोणत्याही ग्राहकाला विशिष्ट विक्रेता पसंत करता येत नाही कारण,

1. वस्तू एकजिनसी असतात  2. वस्तूत भेद असतो
3. वस्तूत थोडाफार एकजिनसीपणा असतो  4. वरिलपैकी नाही

87. पूर्ण स्पर्धेत दीर्घकाळात उदयोगसंस्थांना मिळणारा नफा,

1. केवळ साधारण नफा असतो  2. असाधारण नफा असतो
3. साधारण, असाधारण अशा दोन्ही प्रकारचा नफा असतो
4. अतिप्रमाणात असतो

88. पूर्ण स्पर्धेत वैयक्तिक उदयोगसंस्था,

1. किंमतीचा निर्णय स्वत: घेवू शकते  2. किंमतीत बदल करू शकते
3. बाजारपेठेत प्रस्थापित झालेली किंमत स्विकारते  4. किंमतीवर वर्चस्व गाजविते

89. अपूर्ण किंवा मर्यादित मक्तेदारी म्हणजे,

1. एकच विक्रेता असतो व वस्तूला जवळचे पर्याय असतात
2. एकच विक्रेता असतो व वस्तूला जवळचे पर्याय नसतात
3. थोडे विक्रेते असतात व ते एकजिनसी वस्तूची विक्री करतात
4. वरिलपैकी नाही

90. मक्तेदारी बाजारात नव्या उदयोगसंस्थांचा प्रवेश ------ असतो.

1. अशक्य  2. शक्य पण अवघड
3. शक्य व सोपा  4. आगदी सोपा

91. मक्तेदारास किंमत भेद करता येतो,

1. प्रत्यक्ष सेवांच्या बाबत  2. पुन:विक्री होवू शकणा या वस्तूबाबत
3. प्रत्यक्ष सेवा आणि पुन:विक्री केल्या जावू शकणा या वस्तूबाबत
4. वरिलपैकी नाही

92. मक्तेदारी उदयोगसंस्थेला असाधारण नफा ------

1. नेहमीच मिळतो  2. नेहमीच मिळत नाही
3. क्वचित मिळतो  4. वरिलपैकी नाही

93. अर्थशास्त्रीय दृष्टया भूमी म्हणजे ,

1. जमीन  2. सागर व जमीन
3. विनिमय मूल्य असणारी सर्व नैसर्गिक साधने  4. मुबलक पुरवठयाची नैसर्गिक साधने

94. **भूमी या घटकाची गतिशीलता -------- नसते.**

1. भौगोलिकदृष्टया
2. उपयोगितेच्या दृष्टीने
3. शेती उत्पादनाच्या दृष्टीने
4. वरिल सर्व

95. **भूमी या घटकाला ----**

1. पुरवठा किंमत नसते
2. पुरवठा किंमत असते
3. जास्त पुरवठा किंमत असते
4. कमी पुरवठा किंमत असते

96. **आर्थिक खंड म्हणजे,**

1. उत्पादनाच्या कोणत्याही घटकाच्या संक्रमण उत्पन्नावरचा वाढावा
2. भूमीच्या वापराकरिता भूमी मालकास दिले जाणारे खंडाचे पैसे
3. घटकाच्या उत्पादनाचा खर्च
4. जमिनीवरील इमारतींचा , सुधारणांचा खर्च

97. **श्रम म्हणजे,**

1. बौध्दिक व शारीरिक असे कोणतेही काम की जे, वित्तीय प्रतिफल करता येते
2. केवळ शारीरिक कामे
3. गुन्हयाचे काम
3. आनंद अगर प्रेमाकरिता केले जाणारे काम

98. **श्रमाला ------ असते.**

1. कमजोर सौदाशक्ती
2. बळकट सौदाशक्ती
3. आक्रमक सौदाशक्ती
4. काहीशी कमजोर सौदाशक्ती

99. **श्रम हा घटक इतर घटकांपासून पुढील बाबतीत वेगळा आहे.**

1. श्रम व श्रमीक एकच असतात
2. श्रम उत्पादक असतो
3. वैयक्तिकरित्या श्रमीकाला श्रम विकावे लागतात
4. 1 व 3

100. **वेतन म्हणजे ---- च्या वापराबदल दिला जाणारा मोबदला**

1. भूमी
2. श्रम
3. भांडवल
4. संयोजक

101. **उत्पादनाचा श्रम हा घटक ------ आहे.**

1. नाशवंत
2. टिकावू
3. काही काळ टिकावू
4. काही काळ नाशवंत

102. **भांडवल हा घटक ----- आहे.**

1. मानवनिर्मित
2. निसर्गनिर्मित
3. स्थिर पुरवठयाचा
4. नाशवंत

103. **भांडवल या घटकास मिळणारा मोबदला म्हणजे ------ होय.**

1. खंड
2. व्याज
3. वेतन
4. नफा

104. **पूढील कोणती बाब भांडवल आहे.**

1. बंद असणारी रिकामी खोली
2. स्वताच्या उपयोगाकरिता वापरलेले शिवणयंत्र
3. इतर ग्राहकांचे शिलाईकाम करण्याकरिता वापरले जाणारे शिवणयंत्र
4. कुटुंबाकरिता खरेदी केलेल्या चार सायकली

105. नफा हा ------ मिळणारा मोबदला होय.

1. जमीन मालकाला
2. श्रमाला
3. भांडवलाला
4. संयोजकाला

106. नफा हा मोबदला होय,

1. करारात्मक आहे
2. निश्चित उत्पन्नाचा आहे
3. फारसे चढउतार नसणारा मोबदला
4. वरिलपैकी नाही

107. शुध्द निव्वळ नफा म्हणजे,

1. संयोजकाला व्यवसायाचा धोका पत्करण्याबददलचा मिळणारा मोबदला
2. संयोजकाला स्वताची जमीन, श्रम व भांडवल वापरण्याबददल मिळणारा मोबदला
3. संयोजकाला व्यवस्थापनाबददल मिळणारा मोबदला
4. वरिल सर्व

108. देशामध्ये एखादया विशिष्ट कालखंडात जेवढया वस्तू व सेवा उत्पादित केल्या जातात त्याला ---म्हणतात.

1. राष्ट्रीय उत्पन्न
2. राष्ट्रीय उत्पादन
3. व्यक्तिगत उत्पन्न
4. देशाचे उत्पन्न

109. एका वर्षाच्या कालावधील देशात निर्माण होणा या वस्तू व सेवांची मोजदाद

1. केली जाते
2. पैशामध्ये केली जाते
3. केली जात नाही
4. वरिलपैकी नाही

110. राष्ट्रीय उत्पन्न हा साठा नसून तो,

1. प्रवाह आहे
2. पैशात व्यक्त केलेले उत्पन्न आहे
3. एका वर्षात उत्पादित केलेले उत्पादन
4. वरिलपैकी नाही

111. राष्ट्रीय उत्पन्नाची निर्मिती ------अशा तीन क्षेत्रात होते.

1. प्राथमिक, दिवतीयक व तृतीयक
2. उत्पादन, उपभोग व उपयोगिता
3. उत्पादन, उत्पादन खर्च व प्राथमिक व दुय्याम क्षेत्र
5. वरिलपैकी नाही

112. ------ अशा राष्ट्रीय उत्पन्न मापनाच्या पध्दती आहेत.

1. उत्पादन, उत्पन्न व खर्च
2. उपभोग, लवचिकता व खर्च
3. उत्पादन, उपभोग व खर्च
4. वरिलपैकी नाही

113. राष्ट्रीय उत्पन्नाची मोजदाद उत्पादन पध्दतीने करताना ------ टाळली पाहिजे.

1. दुहेरी मोजणी
2. पुनरावृत्ती
3. साठा पध्दती
4. वरिलपैकी नाही

114. स्थूल देशांतर्गत उत्पादनातून ------ वजा केला असता निव्वळ देशांतर्गत उत्पादन मिळते.

1. उत्पादन खर्च
2. एकूण खर्च
3. घसारा
4. वरिलपैकी नाही

115. जेव्हा दिलेली सामग्रीही दुस-या व्यक्तीने, संस्थेने संकलित केलेली असेल आणि प्रकाशित स्वरूपात असते तेव्हा अशा सामग्रीला ------ म्हणतात.

1. प्राथमिक सामग्री
2. दुय्यम सामग्री
3. एकत्रित सामग्री
4. संशोधित सामग्री

116. केंद्रिय प्रवृत्तीमध्ये सर्व निरीक्षणांवर आधारित आणि बीजगणितीय नियमांना योग्य असे मोजमाप म्हणजे,

1. अंकगणितीय मध्य
2. बहुलक
3. मध्यगा
4. चतुर्थक

117. मध्यगा म्हणजे,

1. जास्तीत जास्त वारंवारिता असलेली संख्या
2. मध्यभागाच्या निरीक्षणाची किंमत
3. कमीतकमी वारंवार असलेली संख्या
4. पहिल्या आणि शेवटच्या निरीक्षणची सरासरी

118. एका बुटाच्या दुकानासाठी पूढील तिमाहीसाठी नवीन मागणी नोंदविताना सरासरीसाठी योग्य मोजमाप म्हणजे

1. अंकगणितीय मध्य
2. भूमितीय मध्य
3. मध्यगा
4. बहुलक

119. सीमा सुरक्षा दलाच्या नाक्यावर जर प्रत्येक प्रवासी गाडी तपासण्यासाठी थांबवत असतील तर कोणती नमूना पध्दत अवलंबली जाते.

1. साधी यादृच्छिक नमुना पध्दत
2. पध्दतशीर नमुना पध्दत
3. संपूर्ण जनगणना पध्दत
4. पटटा नमूना पध्दत

120. ------ च्या आधारे भूतकालीन कामगिरीचा आढावा घेता येतो. वर्तमानकालीन परिस्थितीचे मूल्यमापन करता येते व भविष्यकालीन धोरण निश्चितीस मदत होते.

1. निर्देशांकाच्या
2. गुणकाच्या
3. प्रवेगाच्या
4. वरिलपैकी नाही